# फिनोलेक्स, मुकुल फाउंडेशनतर्फे गरजूंना मदत

**पुणे, ता. ३१ :** कोरोनामहामारी, निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे देशाच्या विविध भागांतील नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) संपूर्ण देशभरातील गरजूंना मदतीचा हात दिला आहे, असे प्रतिपादन फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी केले. 'एमएमएफ'चा २६ वा वर्धापनदिवस नुकताच पार पडला. त्या निमित्त आयोजित कार्यक्रमात छाब्रिया बोलत होत्या.

छाब्रिया म्हणाल्या, ''रोजंदारीवरील, स्थलांतरित मजूर, गरजू, राजस्थानातील संगीत कलाकार, पुण्यातील तृतीयपंथी समाजाला रेशन देण्यात आले. अनामित्र आणि विकास खन्नाज फीड इंडिया यांच्या सहकार्याने एक लाखापेक्षा जास्त लोकांना अन्नधान्य दिले, तसेच तेरा हजार स्थलांतरित मजुरांना चप्पल, खाद्य वाटण्यात आले. कापडी मास्कच्या माध्यमातून एचआयव्हीग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून दिला.''